| सोलापूर विद्यापीठ<br>पी.जी.प्रवेश विभाग<br>सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर ४१३ २५५<br>ईपीएबीक्स - ०२१७-२७४४७७८ (११ लाईन्स)<br>विस्तृत क्र. ११५ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०<br>संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>ई-मेल: bcud@sus.ac.in / pgadmission@sus.ac.in | सोलापूर विद्यापीठ<br>॥ विद्यया संपन्नता ॥<br>NAAC Accredited-2015<br>B Grade (CGPA 2.62) | **Solapur University**<br>**PG Admission Section**<br>Solapur-Pune National Highway, Kegaon,<br>Solapur-413 255<br>EPABX No. 0217- 2744778 (11 lines)<br>Ext. No. 115. Fax No.0217-2744770<br>Website : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>E-mail : bcud@sus.ac.in / pgadmission@sus.ac.in |
|---|---|---|

संदर्भ क्र. सोविसो/पी.जी.प्रवेश/6162 दिनांक 20 JUL 2018

**प्रति,**

मा.प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुले,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय:- विद्यार्थी प्रवेश DC (Digital College) ॲप्लिकेशन मधून करणेबाबत.**

संदर्भ:- १. विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/पी.जी.प्रवेश विभाग/५३५७ दि. २६/०६/२०१८
२. विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/पी.जी.प्रवेश विभाग/५८२४ दि. १०/०७/२०१८

महोदय/महोदया,

विद्यापीठाने शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा बोजा कमी करण्यासाठी प्रवेश प्रक्रियेकरिता SUOA (Solapur University Online Application) सुरु करण्यात आले होते परंतु काही प्राचार्य व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदर प्रक्रियेबद्दल नाराजी व्यक्त केली आहे की सदर प्रक्रिया User Friendly नाही व विद्यार्थ्यांसाठी खर्चिक आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेवून विद्यापीठ प्रशासनाने SUOA (Solapur University Online Application) बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

सबब महाविद्यालयाने प्रवेश प्रक्रियेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. दि. १७/०७/२०१८ पासून सर्व अभ्यासक्रमांचे प्रवेश DC (Digital College) ॲप्लिकेशनद्वारे करावेत.
२. ज्या महाविद्यालयांनी दि. १६/०७/२०१८पूर्वी SUOA (Solapur University Online Application) द्वारे विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया राबविली आहे त्या विद्यार्थ्यांचे पुन्हा DC (Digital College) ॲप्लिकेशन मध्ये प्रवेश करण्याची गरज नाही फक्त Subject Selection व पात्रता अर्जाबाबतची कार्यवाही DC (Digital College) या ॲप्लिकेशन मधून करावी.
३. ज्या विद्यार्थ्यांचे SUOA (Solapur University Online Application) किंवा DC (Digital College) ॲप्लिकेशन मधून प्रवेश झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज व शुल्क पात्रता विभागाने जाहिर केलेल्या विहित मुदतीमध्ये पात्रता विभागाकडे जमा करावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा.डॉ.व्ही.बी.पाटील,)
विशेष कार्यासन अधिकारी
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

**प्रत,**

**परीक्षा व मूल्यमापन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ**

D.:/Ashok/All Letter,

| सोलापूर विद्यापीठ<br>पी.जी.प्रवेश विभाग<br>सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर ४१३ २५५<br>ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स)<br>विस्तृत क्र. ११५ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०<br>संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>ई-मेल: bcud@sus.ac.in / pgadmission@sus.ac.in | NAAC Accredited-2015<br>B Grade (CGPA 2.62) | **Solapur University**<br>PG Admission Section<br>Solapur-Pune National Highway, Kegaon,<br>Solapur-413 255<br>EPABX No. 0217- 2744778 (11 lines)<br>Ext. No. 115. Fax No.0217-2744770<br>Website : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>E-mail : bcud@sus.ac.in / pgadmission@sus.ac.in |
|---|---|---|

संदर्भ क्र. सोविसो/पी.जी.प्रवेश/ 5357 दिनांक 26 JUN 2018

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुले
सोलापूर, विद्यापीठ, सोलापूर

विषय :- महाविद्यालयामध्ये व विद्यापीठ संकुलामधील विविध अभ्यासक्रमास प्रवेशाकरिता ऑनलाईन आवेदन पत्र सादर करणेबाबत.

संदर्भ:- दि. २२/०६/२०१८ रोजी विद्यापीठामध्ये महाविद्यालय व संकुलातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी आयोजित कार्यशाळा.

महोदय / महोदया,

महाविद्यालयातील व विद्यापीठ संकुलातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यावरील कामाचा बोजा कमी करण्याकरिता विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातील व विद्यापीठ संकुलामधील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशाकरिता आवेदन पत्र सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरु करण्याची बाब विद्यापीठ प्रशाशनाच्या विचारार्थ होती. त्यास अनुसरुन सदर ऑनलाईन प्रक्रियेबाबत संदर्भिय प्रशिक्षण आयोजित केले होते.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे प्रवेश करण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतले आहेत किंवा प्रवेश घेण्यास इच्छुक आहेत अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Online Application for Admission /Enrollment या Link वरुन प्रवेशाबद्दलचे आवेदन पत्र सादर करण्याची सुचना महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना द्यावी.
२. ज्या इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ऑनलाईन आवेदन पत्र सादर केले आहे त्यांनी दोन दिवसाच्या आत संबंधित महाविद्यालयामध्ये आवेदन पत्राची प्रिंन्ट सादर करणे बंधनकारक आहे.
३. महाविद्यालयाने इच्छुक विद्यार्थ्यांच्या आवेदन पत्रानुसार विद्यापीठ व शासन नियमानुसार सर्व प्रक्रिया पार पाडून विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
४. विद्यार्थ्यांने प्रवेशासाठी ऑनलाईन आवेदन पत्र सादर केले याचा अर्थ संबंधित विद्यार्थ्याला प्रवेश मिळेलच असे नाही.
५. विद्यार्थी पात्रतेनुसार एकापेक्षा जास्त अभ्यासक्रमांना व एकापेक्षा जास्त महाविद्यालयास प्रवेशासाठी आवेदन पत्र सादर करु शकतो.
६. महाविद्यालयामध्ये व विद्यापीठ संकुलामधील प्रवेशाबाबतचे सर्व अधिकार संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापीठ संकुलाचे संचालक यांच्याकडे नियमानुसार राहतील.

| सोलापूर विद्यापीठ<br>पी.जी.प्रवेश विभाग<br>सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव, सोलापूर ४१३ २५५<br>ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स)<br>विस्तृत क्र. ११५ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०<br>संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>ई-मेल: bcud@sus.ac.in / pgadmission@sus.ac.in | सोलापूर विद्यापीठ<br>॥ विद्यया संपन्नता ॥<br>NAAC Accredited-2015<br>B Grade (CGPA 2.62) | **Solapur University**<br>**PG Admission Section**<br>Solapur-Pune National Highway, Kegaon,<br>Solapur-413 255<br>EPABX No. 0217- 2744778 (11 lines)<br>Ext. No. 115. Fax No.0217-2744770<br>Website : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>E-mail : bcud@sus.ac.in / pgadmission@sus.ac.in |
|---|---|---|

संदर्भ क्र. सोविसो/पी.जी.प्रवेश/5824 दिनांक 10 JUL 2018

**प्रति,**
मा.प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ संकुले,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय:- ऑनलाईन प्रवेशासाठी आवेदन पत्र सादर करण्याच्या मुदतीबाबत.**
संदर्भ:- सोविसो/पी.जी.प्रवेश विभाग/५३५७/ दि. २६/०६/२०१८ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये महाविद्यालयात व विद्यापीठ संकुलामध्ये विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश आवेदन पत्र Solapur University Online Application (SUOA) या पोर्टलवर सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, सदर पोर्टलवर प्रवेश पत्र ऑनलाईन सादर करण्याचा कालावधी व महाविद्यालयाने / संकुलाने प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन Submit / Confirm करण्यासाठीचा कालावधी खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | विद्यार्थ्यांनी प्रवेश आवेदन पत्र ऑनलाईन सादर करण्याची मुदत | प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांना/संकुलाने ऑनलाईन Submit / Confirm करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | F.Y.B.A, F.Y.B.Com<br>B.Sc-I (No Branch)<br>B.Sc-I (Biotechonology)<br>B.Sc-I (ECS)<br>B.Sc-I (Entrepremeurship)<br>B.B.A -I<br>B.C.A-I | १६/०७/२०१८ | २३/०७/२०१८ |

महाविद्यालयाने / संकुलाने प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांना Submit / Confirm करण्याची Link विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच त्यासंदर्भातील PPT सादरीकरणही संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
(प्रा.डॉ.व्ही.बी.पाटील,)
विशेष कार्यासन अधिकारी
शैक्षणिक, संशोधन आणि विकास